दि.०९/०१/२०२५

# // प्रेसनोट //

Human Metapneumovirus (HMPV) हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे, जो श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरतो. हा एक हंगामी आजार आहे जो सामान्यतः आर.एस.व्ही आणि फ्लू प्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो. हा विषाणू सर्वप्रथम नेदरलँडस मध्ये २००१ मध्ये आढळला आहे. चीन देशामधून आलेल्या Human Metapneumovirus (HMPV) अहवालांबाबत चिंतेचे कारण नाही.

तथापि, नागरीकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करु नये या संदर्भातील सुचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

❖ काय करावे :

- जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
- साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
- भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा.
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्यावी.

❖ हे करू नये :

- हस्तांदोलन करु नये.
- टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर करु नये.
- आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळा.
- डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करु नये.
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये.
- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेऊ नये.

*टिप:- कोणतीही सदृश्य लक्षणे आढळल्यास नजिकच्या रुग्णालयास किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास संपर्क साधावा.

अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका